| | |
|---|---|
| विषय क्र.०१. दि.०१,डिसेंबर, २०२१. | **कोविड-१९ या महामारीच्या स्थितीमुळे केंद्र व राज्य शासनाकडून लागू करण्यात आलेल्या टाळेबंदीच्या कालावधीत परिवहन उपक्रमाच्या बस शेल्टर व बसेसवर जाहिरात प्रदर्शित करण्याबाबत प्रदान करावयाच्या मासिक भाडे रकमेत सूट देणेबाबतचे धोरणास मंजूरी मिळणेबाबत, परिवहन व्यवस्थापकांचे दिनांक ०१/१२/२०२१, चे पत्र जा. क्र. नमुंमपा/परि/अभि/१२९/२०२१.** |
| **ठराव क्र. १५९७.** | "उपरोक्त संदर्भात कोविड-१९ या महामारीच्या स्थितीमुळे केंद्र व राज्य शासनाकडून लागू करण्यात आलेल्या टाळेबंदीच्या कालावधीत परिवहन उपक्रमाच्या बस शेल्टर व बसेसवर जाहिरात प्रदर्शित करण्याबाबत प्रदान करावयाच्या मासिक भाडे रकमेत सूट देणेबाबतचे धोरणास मंजूरी मिळणेबाबत, प्रस्तावित केल्याप्रमाणे नवी मुंबई महानगरपालिका परिवहन उपक्रमाने बस शेल्टर बांधा, वापरा, हस्तांतरीत करा (BOT) तत्वावर व त्यावर जाहिरात करण्याचे तसेच उपक्रमातील एसी व नॉन एसी बसेसवर जाहिरात करण्याचे कंत्राट विविध कंत्राटदारांना देण्यात आलेले आहेत. |

कोवीड-19 च्या प्रादुर्भावामुळे दिनांक 22/03/2020 पासून केंद्र आणि राज्य शासनाने टाळेबंदी जाहीर केल्यामुळे, अत्यावश्यक सेवा वगळून इतर नियमीत कामकाजावर परिणाम होवून जाहिरात व्यवसायासह सर्व सार्वजनिक/खाजगी संस्थंचे कामकाज ठप्प झाले. त्या अनुषंगाने टाळेबंदी कालावधी दरम्यान परिवहन उपक्रमाच्या बस शेल्टरवर जाहिरात प्रदर्शित करण्याबाबतचे भाडे रक्कम परिवहन उपक्रमास प्रदान करावयाच्या रकमेमध्ये सूट मिळण्याकरीता संबंधित कंत्राटदारांनी पत्रांव्दारे परिवहन उपक्रमाला विनंती केली होती.

कोवीड-19 महामारीच्या परिस्थितीमुळे MSRDC, PMPML व बेस्ट इत्यादी प्राधिकरणांदेखील त्यांचेकडील जाहिरात निविदेतील ठेकेदारांना जाहिरात प्रदर्शित करण्याबाबतचे भाडे रक्कम भरणा करण्याच्या रकमेमध्ये सवलत/ सूट देण्यास मंजूरी दिलेली आहे.

कोवीड-19 चा प्रादुर्भाव सुरु झाल्यानंतर त्याचा प्रसार रोखण्याकरीता शासनाकडून टाळेबंदी लागू करण्यात आल्यामुळे काही प्रमाणात अत्यावश्यक सेवा वगळता इतर सर्व सार्वजनिक / खाजगी उद्योग, व्यवसाय, कार्यालये बंद ठेवण्यात आली. त्यामुळे संपूर्ण राज्यासह देश व जागतीक अर्थव्यवस्था विस्कळीत झाली. त्याचा परिवहन उपक्रमाच्या बस शेल्टरवर जाहिरात प्रदर्शित करण्यावर मोठा परिणाम झाला. त्याबाबत संबंधित ठेकेदारांनी परिवहन उपक्रमाकडे भाडे रक्कम भरणा करणेबाबत सूट/ सवलत मागितली होती. त्याबाबत परिणामांची खातरजमा करण्याकरीता आणि या अनिश्चिततेच्या काळात शक्य ते उत्तम पर्याय काढण्याकरीता मा. परिवहन व्यवस्थापक यांनी समिती गठीत करुन बैठक घेण्याबाबत निर्देश दिले. त्यानुसार गठीत समितीची दिनांक 09/03/2021 व दिनांक 06/07/2021 रोजी बैठक आयोजित करण्यात आली. त्यापैकी दिनांक 06/07/2021 रोजीच्या बैठकीस ठेकेदारांचे प्रतिनिधी हजर राहीले होते. सदर बैठकीत तसेच ठेकेदारांकडून प्राप्त पत्रांमध्ये पुढीलप्रमाणे मागणी करण्यात आलेली आहे.

1. केंद्र शासनाने कोवीड-19 महामारी ही फोर्स मेजर (Force Majeure) या संज्ञेमध्ये समाविष्ट केलेली आहे. तसेच जाहिरात ठेकेदारांनी दिलेल्या पत्रामध्ये पुढीलप्रमाणे मुद्दे / मागण्या मांडण्यात आलेले आहेत.
   - i. सदर निविदा संपूर्ण टाळेबंदीच्या कालावधीपर्यंत तात्पुरत्या स्वरूपात खंडीत करण्यात यावी.
   - ii नजीकच्या काळात टाळेबंदी उठविण्यात आल्यानंतर व कोवीड-19 ची साथ आटोक्यात आली तरी जाहिरातदारांना त्यांचा व्यवसाय पुन्हा सुरु करुन पुरेसे उत्पन्न प्राप्त करणे अवघड असल्याने निविदेतील पुढील 4 तिमाहींचे भाडे रक्कम भरणा करण्यास 100% सवलत देण्यात यावी.
   - iii आमच्या मागणीनुसार तात्पुरत्या कालावधीकरीता 100% भाडे सवलतीसह खंडीत करण्यात आलेल्या कालावधीइतकी सदर निविदेस मुदतवाढ देण्यात यावी.

उपक्रमाच्या बसशेल्टर आणि बसवर होणाऱ्या जाहिराती या जनतेच्या दैनंदिन वापरातील वस्तू, सौदर्य प्रसाधने, इलेक्ट्रिक साधन, नवीन घर अशा प्रकारच्या असतात. कोवीड-19 च्या कालावधीत कोरोना वायरसचा प्रसार रोखण्यासाठी शासनाकडून टाळेबंदी लागू करण्यात आली. त्यामुळे काही कालावधीकरीता सर्व कार्यालये, कारखाने, दुकान हे बंद ठेवण्यात आलेले होते. या कालावधीत फक्त अत्यावश्यक सेवेतील कर्मचाऱ्यांना कामावर ये-जा करण्याची परवानगी देण्यात आलेली होती. त्यामुळे रस्त्यावरील सामान्य जनतेची वर्दळ पुर्णपणे बंद झ ाल्यामुळे व ग्राहकांकडून मागणी पुर्णपणे बंद झाल्यामुळे उत्पादकांकडून ठेकेदारास देण्यात येणाऱ्या जाहिराती रद्द करण्यात आल्याने संपूर्ण कामकाज बंद असल्याने ठेकेदारास कसलेही उत्पन्न प्राप्त होत नसल्याने त्यांनी निविदेतील भाडे रक्कम भरणा करण्यास सूट / सवलत मिळणेबाबत विनंती केली आहे. तसेच कोवीड-19 मुळे बाजारात मंदी असल्याने उत्पादन व विक्री करण्यास बंधने होती. या सर्व बाबींमुळे बाजारात मंदीसदृष्य परिस्थिती निर्माण झालेली होती. अशी परिस्थिती अपेक्षित नसल्याने या परिस्थितीतून मार्ग काढण्याकरीता संबंधित समिती गठित करुन निर्णय घेणेबाबत चर्चेअंती ठरले.

तदअनुषंगाने सदर बैठकीत परिवहन उपक्रमाच्या बस शेल्टर निविदेतील ठेकेदारांना भाडे रकमेत सूट देण्याबाबत तसेच कंत्राटाचे सातत्य टिकवून ठेवण्याचा परिवहन उपक्रमाचा उद्देश साध्य करुन कंत्राटदारास सूट देवून आणि उपक्रमाची महसूल सुरु राहण्याच्या दृष्टीने तसेच सद्याची व्यापार उद्योगाची स्थिती, आर्थिक मंदी व MSRDC, PMPML व बेस्ट इत्यादी प्राधिकरणांनी दिलेली सवलत विचारात घेता काही अटी व शर्तीच्या अधिन राहून पुढील प्रमाणे सूट प्रस्तावित करण्यात आली आहे.

**१) बसशेल्टर्स कंत्राटाकरीता प्रस्तावित भाडे सुटः**

| अ.क्र. | कालावधी | भाडे रकमेत दयावयाची सूट |
|---|---|---|
| 1 | एप्रिल 2020 ते जून 2020 | 90% |
| 2 | जुलै 2020 ते सप्टेंबर 2020 | 80% |
| 3 | ऑक्टोंबर 2020 ते डिसेंबर 2020 | 50% |
| 4 | जानेवारी 2021 ते मार्च 2021 | 25% |
| 5 | एप्रिल 2021 ते मे 2021 | 90% |
| 6 | जून 2021 ते जुलै 2021 | 50% |

**२) बसेसवरील जाहिरातीच्या कंत्राटाकरीता प्रस्तावित भाडे सुटः**

अ) नॉन एसी बसेसकरीता (प्रत्यक्ष सरासरी बहिर्गमनानुसार):

| अ. क्र. | कालावधी | भाडे रकमेत दयावयाची सुट (%) मध्ये | भरणा करुन घ्यावयाची भाडे रक्कम (%) मध्ये |
|---|---|---|---|
| १ | एप्रिल २०२० ते जून २०२० | १००% | निरंक |
| २ | जुलै २०२० ते सप्टेंबर २०२० | ७५% | २५% |
| ३ | ऑक्टोबर २०२० ते डिसेंबर २०२० | २५% | ७५% |
| ४ | जानेवारी २०२१ ते जुलै २०२१ | १०% | ९०% |

ब) एसी वोल्वो बसेसकरीता (प्रत्यक्ष सरासरी बहिर्गमनानुसार):

| अ. क्र. | कालावधी | भाडे रकमेत दयावयाची सुट (%) मध्ये | भरणा करुन घ्यावयाची भाडे रक्कम (%) मध्ये |
|---|---|---|---|
| १ | एप्रिल २०२० ते जून २०२० | १००% | निरंक |
| २ | जुलै २०२० ते ऑक्टोबर २०२० | १००% | निरंक |
| ३ | नोव्हेंबर २०२० ते डिसेंबर २०२० | ५०% | ५०% |
| ४ | जानेवारी २०२१ ते जुलै २०२१ | ५०% | ५०% |

उपरोक्त प्रस्ताव स्विकारल्यानंतर, संबंधित सर्व ठेकेदारांना निविदा समाप्त करता येणार नाही. याबाबत संबंधित निविदाकाराकडून उपक्रमास आश्वासित करण्याकरीता रु. 500 च्या मुद्रांकान्वये नोटराईज्ड हमीपत्र सादर करणे अनिवार्य असेल. तथापि, वरील प्रस्ताव स्विकारल्यानंतर जर एखादया निविदाकाराने निविदेतून माघार घेतली तर उपरोक्त सूट त्वरीत काढून घेण्यात येईल आणि सुरक्षा अनामत रक्कम जप्त करण्यात येईल. सदरचा कोविड कालावधीतील बसशेल्टर्स व बसेसवरील भाडे सुट बाबतचा प्रस्ताव प्रस्तावात नमूद करण्यात आलेल्या बाबींसह, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ कलम ७३(क) नुसार मा.आयुक्त तथा प्रशासक यांची मंजुरी देण्यात यावी."

**निर्णय :**

ठराव करण्यात येतो की,

कोविड-१९ या महामारीच्या स्थितीमुळे केंद्र व राज्य शासनाकडून लागू करण्यात आलेल्या टाळेबंदीच्या कालावधीत परिवहन उपक्रमाच्या बस शेल्टर व बसेसवर जाहिरात प्रदर्शित करण्याबाबत प्रदान करावयाच्या मासिक भाडे रकमेत सूट देणेबाबतचे धोरणास मंजूरी मिळणेबाबत, सादर केलेल्या प्रस्तावाचे अवलोकन केले आहे.

त्यानुसार विषय क्रमांक ०१ ठराव क्रमांक १५९७ अन्वये, प्रस्तावित केल्याप्रमाणे नवी मुंबई महानगरपालिका परिवहन उपक्रमाने बस शेल्टर बांधा, वापरा, हस्तांतरीत करा (BOT) तत्वावर व त्यावर जाहिरात करण्याचे तसेच उपक्रमातील एसी व नॉन एसी बसेसवर जाहिरात करण्याचे कंत्राट विविध कंत्राटदारांना देण्यात आलेले आहेत.

कोवीड-19 च्या प्रादुर्भावामुळे दिनांक 22/03/2020 पासून केंद्र आणि राज्य शासनाने टाळेबंदी जाहीर केल्यामुळे, अत्यावश्यक सेवा वगळून इतर नियमीत कामकाजावर परिणाम होवून जाहिरात व्यवसायासह सर्व सार्वजनिक/खाजगी संस्थंचे कामकाज ठप्प झाले. त्या अनुषंगाने टाळेबंदी कालावधी दरम्यान परिवहन उपक्रमाच्या बस शेल्टरवर जाहिरात प्रदर्शित करण्याबाबतचे भाडे रक्कम परिवहन उपक्रमास प्रदान करावयाच्या रकमेमध्ये सूट मिळण्याकरीता संबंधित कंत्राटदारांनी पत्रांव्दारे परिवहन उपक्रमाला विनंती केली होती.

कोवीड-19 महामारीच्या परिस्थितीमुळे MSRDC, PMPML व बेस्ट इत्यादी प्राधिकरणांदेखील त्यांचेकडील जाहिरात निविदेतील ठेकेदारांना जाहिरात प्रदर्शित करण्याबाबतचे भाडे रक्कम भरणा करण्याच्या रकमेमध्ये सवलत/ सूट देण्यास मंजूरी दिलेली आहे.

कोवीड-19 चा प्रादुर्भाव सुरु झाल्यानंतर त्याचा प्रसार रोखण्याकरीता शासनाकडून टाळेबंदी लागू करण्यात आल्यामुळे काही प्रमाणात अत्यावश्यक सेवा वगळता इतर सर्व सार्वजनिक / खाजगी उद्योग, व्यवसाय, कार्यालये बंद ठेवण्यात आली. त्यामुळे संपूर्ण राज्यासह देश व जागतीक अर्थव्यवस्था विस्कळीत झाली. त्याचा परिवहन उपक्रमाच्या बस शेल्टरवर जाहिरात प्रदर्शित करण्यावर मोठा परिणाम झाला. त्याबाबत संबंधित ठेकेदारांनी परिवहन उपक्रमाकडे भाडे रक्कम भरणा करणेबाबत सूट/ सवलत मागितली होती. त्याबाबत परिणामांची खातरजमा करण्याकरीता आणि या अनिश्चिततेच्या काळात शक्य ते उत्तम पर्याय काढण्याकरीता मा. परिवहन व्यवस्थापक यांनी समिती गठीत करुन बैठक घेण्याबाबत निर्देश दिले. त्यानुसार गठीत समितीची दिनांक 09/03/2021 व दिनांक 06/07/2021 रोजी बैठक आयोजित करण्यात आली. त्यापैकी दिनांक 06/07/2021 रोजीच्या बैठकीस ठेकेदारांचे प्रतिनिधी हजर राहीले होते. सदर बैठकीत तसेच ठेकेदारांकडून प्राप्त पत्रांमध्ये पुढीलप्रमाणे मागणी करण्यात आलेली आहे.

1. केंद्र शासनाने कोवीड-19 महामारी ही फोर्स मेजर (Force Majeure) या संज्ञेमध्ये समाविष्ट केलेली आहे. तसेच जाहिरात ठेकेदारांनी दिलेल्या पत्रामध्ये पुढीलप्रमाणे मुद्दे / मागण्या मांडण्यात आलेले आहेत.
   - i. सदर निविदा संपूर्ण टाळेबंदीच्या कालावधीपर्यंत तात्पुरत्या स्वरूपात खंडीत करण्यात यावी.
   - ii नजीकच्या काळात टाळेबंदी उठविण्यात आल्यानंतर व कोवीड-19 ची साथ आटोक्यात आली तरी जाहिरातदारांना त्यांचा व्यवसाय पुन्हा सुरु करुन पुरेसे उत्पन्न प्राप्त करणे अवघड असल्याने निविदेतील पुढील 4 तिमाहींचे भाडे रक्कम भरणा करण्यास 100% सवलत देण्यात यावी.
   - iii आमच्या मागणीनुसार तात्पुरत्या कालावधीकरीता 100% भाडे सवलतीसह खंडीत करण्यात आलेल्या कालावधीइतकी सदर निविदेस मुदतवाढ देण्यात यावी.

उपक्रमाच्या बसशेल्टर आणि बसवर होणाऱ्या जाहिराती या जनतेच्या दैनंदिन वापरातील वस्तू, सौदर्य प्रसाधने, इलेक्ट्रिक साधन, नवीन घर अशा प्रकारच्या असतात. कोविड-19 च्या कालावधीत कोरोना वायरसचा प्रसार रोखण्यासाठी शासनाकडून टाळेबंदी लागू करण्यात आली. त्यामुळे काही कालावधीकरीता सर्व कार्यालये, कारखाने, दुकान हे बंद ठेवण्यात आलेले होते. या कालावधीत फक्त अत्यावश्यक सेवेतील कर्मचाऱ्यांना कामावर ये-जा करण्याची परवानगी देण्यात आलेली होती. त्यामुळे रस्त्यावरील सामान्य जनतेची वर्दळ पुर्णपणे बंद झाल्यामुळे व ग्राहकांकडून मागणी पुर्णपणे बंद झाल्यामुळे उत्पादकांकडून ठेकेदारास देण्यात येणाऱ्या जाहिराती रद्द करण्यात आल्याने संपूर्ण कामकाज बंद असल्याने ठेकेदारास कसलेही उत्पन्न प्राप्त होत नसल्याने त्यांनी निविदेतील भाडे रक्कम भरणा करण्यास सूट / सवलत मिळणेबाबत विनंती केली आहे. तसेच कोवीड-19 मुळे बाजारात मंदी असल्याने उत्पादन व विक्री करण्यास बंधने होती. या सर्व बाबींमुळे बाजारात मंदीसदृष्य परिस्थिती निर्माण झालेली होती. अशी परिस्थिती अपेक्षित नसल्याने या परिस्थितीतून मार्ग काढण्याकरीता संबंधित समिती गठित करुन निर्णय घेणेबाबत चर्चेअंती ठरले.

तदअनुषंगाने सदर बैठकीत परिवहन उपक्रमाच्या बस शेल्टर निविदेतील ठेकेदारांना भाडे रकमेत सूट देण्याबाबत तसेच कंत्राटाचे सातत्य टिकवून ठेवण्याचा परिवहन उपक्रमाचा उद्देश साध्य करुन कंत्राटदारास सूट देवून आणि उपक्रमाची महसूल सुरु राहण्याच्या दृष्टीने तसेच सद्याची व्यापार उद्योगाची स्थिती, आर्थिक मंदी व MSRDC, PMPML व बेस्ट इत्यादी प्राधिकरणांनी दिलेली सवलत विचारात घेता काही अटी व शर्तीच्या अधिन राहून पुढील प्रमाणे सूट प्रस्तावित करण्यात आली आहे.

**१) बसशेल्टर्स कंत्राटाकरीता प्रस्तावित भाडे सुटः**

| अ.क्र. | कालावधी | भाडे रकमेत दयावयाची सूट |
|---|---|---|
| 1 | एप्रिल 2020 ते जून 2020 | 90% |
| 2 | जुलै 2020 ते सप्टेंबर 2020 | 80% |
| 3 | ऑक्टोंबर 2020 ते डिसेंबर 2020 | 50% |
| 4 | जानेवारी 2021 ते मार्च 2021 | 25% |
| 5 | एप्रिल 2021 ते मे 2021 | 90% |
| 6 | जून 2021 ते जुलै 2021 | 50% |

**२) बसेसवरील जाहिरातीच्या कंत्राटाकरीता प्रस्तावित भाडे सुटः**

अ) नॉन एसी बसेसकरीता (प्रत्यक्ष सरासरी बहिर्गमनानुसार):

| अ. क्र. | कालावधी | भाडे रकमेत दयावयाची सुट (%) मध्ये | भरणा करुन घ्यावयाची भाडे रक्कम (%) मध्ये |
|---|---|---|---|
| १ | एप्रिल २०२० ते जून २०२० | १००% | निरंक |
| २ | जुलै २०२० ते सप्टेंबर २०२० | ७५% | २५% |
| ३ | ऑक्टोबर २०२० ते डिसेंबर २०२० | २५% | ७५% |
| ४ | जानेवारी २०२१ ते जुलै २०२१ | १०% | ९०% |

ब) एसी वोल्वो बसेसकरीता (प्रत्यक्ष सरासरी बहिर्गमनानुसार):

| अ. क्र. | कालावधी | भाडे रकमेत दयावयाची सुट (%) मध्ये | भरणा करुन घ्यावयाची भाडे रक्कम (%) मध्ये |
|---|---|---|---|
| १ | एप्रिल २०२० ते जून २०२० | १००% | निरंक |
| २ | जुलै २०२० ते ऑक्टोबर २०२० | १००% | निरंक |
| ३ | नोव्हेंबर २०२० ते डिसेंबर २०२० | ५०% | ५०% |
| ४ | जानेवारी २०२१ ते जुलै २०२१ | ५०% | ५०% |

उपरोक्त प्रस्ताव स्विकारल्यानंतर, संबंधित सर्व ठेकेदारांना निविदा समाप्त करता येणार नाही. याबाबत संबंधित निविदाकाराकडून उपक्रमास आश्वासित करण्याकरीता रु. 500 च्या मुद्रांकान्वये नोटराईज्ड हमीपत्र सादर करणे अनिवार्य असेल. तथापि, वरील प्रस्ताव स्विकारल्यानंतर जर एखादया निविदाकाराने निविदेतून माघार घेतली तर उपरोक्त सूट त्वरीत काढून घेण्यात येईल आणि सुरक्षा अनामत रक्कम जप्त करण्यात येईल. सदरचा कोविड कालावधीतील बसशेल्टर्स व बसेसवरील भाडे सुट बाबतचा प्रस्ताव प्रस्तावात नमूद करण्यात आलेल्या बाबींसह, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ कलम ७३(क) नुसार मा.आयुक्त तथा प्रशासक यांची मंजुरी देण्यात येत आहे.

**सही/-**
**(चित्रा बाविस्कर)**
**नगरसचिव**
**नवी मुंबई महानगरपालिका**

**सही/-**
**(अभिजीत बांगर)**
**आयुक्त तथा प्रशासक**
**नवी मुंबई महानगरपालिका**